# इंटरनेट सुरक्षा काळाची गरज : गजानन कांबळे

## महाडिक अभियांत्रिकीत 'क्विक हिल' अंतर्गत कार्यशाळा

इस्लामपूर ● प्रतिनिधी

पेठ ता.वाळवा येथील श्री व्यंकटेश्वरा शिक्षण संस्था संचलित नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालय व क्विक हिल पुणे यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला. यावेळी संस्थेचे सचिव राहुल महाडिक उपस्थित होते. यावेळी सायबर सिक्युरिटी अवेअरनेस या विषयावर कार्यशाळा पार पडली.

यावेळी स.पो.नि.गजानन कांबळे, क्विक हिल पुणेच्या सुगंधा दाणी, संस्थेचे कार्यकारी संचालक प्रा.महेश जोशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.ए.कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. सांगली सायबर सेलचे स.पो.नि.गजानन कांबळे यांनी सायबर सिक्युरिटी या विषयावर मार्गदर्शन करताना सायबर गुन्हे, पार्श्वभूमी व आवश्यक काळजी यावर विचार मांडले.



महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयात सायबर सिक्युरिटी विषयावर मार्गदर्शन करताना स.पो.नि.गजानन कांबळे व्यासपीठावर सुगंधा दाणी, प्रा.महेश जोशी, प्रा.डॉ.व्ही.ए.कुलकर्णी...

क्विक हिल टेक्नोलॉजीच्या सुगंधा दाणी म्हणाल्या, सामंजस्य करारांतर्गत महाडिक अभियांत्रिकीच्या माध्यमातून सुमारे १५५०० शालेय विद्यार्थ्यांना सायबर सिक्युरिटी या विषयावर केलेले मार्गदर्शन कौतुकास्पद असून यापुढील काळातही असेच विधायक कार्य होईल. गुणवत्तापूर्ण तंत्रशिक्षणाबरोबरच विविध नामांकित कंपन्यांशी महाविद्यालयाचा करार झाला असून विद्यार्थ्यांना ट्रेनिंग, सर्टिफिकेशन व प्लेसमेंटसाठी फायदा होणार असल्याचे मत संस्थेचे कार्यकारी संचालक प्रा.महेश जोशी यांनी व्यक्त केले.

सायबर सिक्युरिटी ही काळाची गरज असून याविषयी जनजागृती व्हावी यासाठी कार्यशाळा फायदेशीर आहे, असे मत प्राचार्य डॉ.व्ही.ए. कुलकर्णी यांनी व्यक्त केले. यावेळी कॉम्प्युटर इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशनची कार्यकारिणी समिती स्थापन करण्यात आली. विभागप्रमुख प्रा.इम्रान इनामदार यांच्यासह स्टाफ व विद्यार्थ्यांनी संयोजन केले.